# प्रास्ताविक

मानवांच्या जीवनात अनेक सुख-दु:ख-संवेदनांचे प्रसंग येत राहतात. त्या संवेदनशील जीवनात आपण किती तटस्थतेने, किती अलिप्तपणे त्या घटनांचा आस्वाद घेऊ शकतो, यावरच ख-या आत्मअनुभूतीचा आविष्कार अवलंबून असतो.

या मालेच्या संस्थापक-अध्यक्षा प्रा. सौ. लीलावती जैन याम्चा पहिला कथा संग्रह कथा-सौरभ या नावाने प्रकाशित झाला आहे. जैन समाजातील आबालवृध्दांनी त्याचे स्वागर केले. सोप्या, सुबोध, सकस व जीवन प्रेरक कथांच्या माध्यमातून ऐहीक जीवनातील कडू-गोड प्रसंगी मानवाने कसे वागावे, कशी आत्म-दृष्टी ठेवावी याचे सम्यक्‌भान घडविणा-या कथा आहेत. सुख-दु:खाचा पुन: प्रत्यय घेणे, यातूनही मन रमते, आनंदीत होते, प्रसन्न होते.

या कथा-संग्रहाचेही असेच आहे. या संग्रहातील दहा कथा लक्षणीय आहेत. समाज बदलत आहे, परिवर्तनही वेगाने घडत आहे. तरी परंतु आत्मा तोच आहे. त्याची सुख-दु:खे फारशी बदललेली नाहीत. जीवनाचे हळुवार नाजूक ताणे-बाणे अत्यंत गंमतशीरपणे विणून एक सुंदर कथा-विश्व सौ. लीला जैन वाचकांना सादर करीत आहेत.सामाजिक आशय व अनुबंध जरी सर्वत्र सारखे असले तरी वाचकांना या सा-या कथा आकर्षित करतील. पुरोगामी विचाराम्चा एक धागा काही कथातून अनुस्यूत असल्याचेही आपणाला दिसून येईल. आम्ही काही सांगण्यापेक्षा खुद्द वाचकच त्या कथांचे रसग्रहण तन्मयतेने, चिकित्सकपणे करू  शकतील.

या कथांच्या निर्मितीत, कथांचे बाबत योग्य त्या सूचना, परीक्षण आमचे मित्रवर्य प्रा. श्री धन्यकुमारजी जैन, प्रा. डॉ. राजेंद्र बीडकर, सोलापूर यांचे सहकार्य लाभले आहे. त्यांचे ऋणातच राहणे इष्ट आहे.

या कथा-संग्रहाची उत्तम, सुंदर छपाई केल्याबद्दल श्री. कुमुदभाई शाह, वर्धमान प्रिंटींग प्रेस, सोलापूर यांचे आम्ही आभारी आहोत.

'मयूर पिच्छी' नावाचा तिसरा कथा-संग्रह लवकरच आपल्या सेवेत दाखल होत आहे.

-संपादक